



दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | शुक्रवार ६ डिसेंबर २०२४ | अंक ३६२ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर


# शेतकऱ्यांना कर्जमाफी ते लाडक्या बहिणींना २१०० रुपये

## सरकार स्थापन होताच अंमलबजावणीचे संकेत



महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील नव्या सरकारची स्थापना झाली आहे. त्यामुळे महायुतीला आता सर्वसामान्य जनतेला दिलेल्या सर्व आश्वासनांची पूर्तता करावी लागणार आहे. महायुतीने निवडणुकीपूर्वी अनेक घोषणा केल्या होत्या. त्यापैकी शेतक–यांची कर्जमाफी आणि लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना १५०० रुपयांच्या ऐवजी २१०० रुपये देण्याचं प्रमुख आश्वासन दिलं होतं. हे आश्वासन आता या नव्या सरकारला पूर्ण करावं लागणार आहे. विशेष म्हणजे महिलांच्या सुरक्षेसाठी नवं सरकार २५ हजार महिलांना पोलीस दलात समाविष्ट करणार असल्याचंदेखील आश्वासन देण्यात आलं होतं. महायुतीचं सरकार राज्यातील लाभार्थी शेतक–यांना शेतकरी सन्मान योजनेच्या माध्यमातून आतापर्यंत १२ हजार रुपये वर्षभरात देत आहे. पण हीच रक्कम १५ हजार करणार असल्याची घोषणा महायुतीकडून निवडणुकीच्या तोंडावर करण्यात आली होती. निवडणुकीपूर्वी महायुतीने काय–काय आश्वासने दिली होती, याची सविस्तर माहिती आम्ही तुम्हाला देणार आहोत. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर आज पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी महायुतीकडून देण्यात आलेल्या सर्व आश्वासनांची पूर्तता केली जाईल,

# सर्व सामान्यांचे लोकनायक आ. सुरेश धस यांना कॅबिनेट मंत्री करुन बीड जिल्ह्याचे पालकमंत्री करावे -ॲड प्रकाश कवठेकर

पाटोदा/(प्रतिनिधी – महाराष्ट्राच्या राजकारणात सर्वमान्य लोकप्रिय आमदार व्यक्तीमत्व म्हणुन सुरेश धस यांची ओळख आहे. गेली तीस वर्षाच्या राजकीय जिवनात त्यांनी आठरापगड जाती धर्माच्या लोकांना न्याय दिला आहे. अशा बहुआयामी आ. सुरेश धस यांना कॅबिनेट मंत्री करून बीड जिल्ह्याचे पालकमंत्री करावे अशी मागणी डोंगर किन्ही जि प सदस्य तथा सामाजिक कार्यकर्ते व प्रसिद्ध उद्योजक तथा ॲड प्रकाश दादा कवठेकर यांनी केली आहे. आ. सुरेश धस यांनी अनेक सामान्य कार्यकर्ते यांना पं.स.सभापती, जि.प.सदस्य.जि.प. अध्यक्ष नगराध्यक्ष , पक्षाची विविध पदे दिली आहेत. ही पदे देतांना कधीच जातपात पाहिली नाही. तळगळातील घटकांचा विचार करून पदे दिली. आष्टी मतदार संघातील आजपर्यंतच्या इतिहासात आ. सुरेश धस यांच्या एवढा विकासासाठी निधी कोणीही आणलेला नाही. या निवडणुकीत सर्व जाती धर्माचे लोक आ. सुरेश धस यांच्या मागे होतेच परंतु गरजवंत मराठा समाज पूर्ण तकदीने त्यांच्या मागे निवडणुकीत ऊभा होता हे विशेष आहे. आज पर्यंत बीड जिल्ह्याला मराठा समाजाचा पालकमंत्री लाभलेला नाही तेंव्हा विकासाभिम नेतृत्व आ. सुरेश धस यांना भाजपाने महाराष्ट्र राज्याचा मंत्री करुन बीड जिल्हा पालकमंत्री करावे अशी मागणी मराठा समाजाच्या वतीने करण्यात येत आहे. सत्ता आसो वा नसो आ. सुरेश धस हे सतत विद्यार्थी, सुशिक्षित बेरोजगार, शेतकरी, कर्मचारी व्यापारी, महिला इत्यादीचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्नशील राहिले आहेत. प्रत्येक घटकांच्या सुख दुःखात ते सहभागी होतात मतदारसंघातील गावांची व तेथील प्रश्नांची जाण असणारा नेता अशी ओळख आ. सुरेश धस यांची आहे.महाराष्ट्रात महायुतीला विधान सभा निवडणुकीत मोठे यश मिळाले आहे या यशात मराठा समाजाचे मोठे योगदान आहे हे कोणीही नाकारू शकत नाही. भाजपा वाढविण्यासाठी आ. सुरेश धस यांनी आहोरात्र मेहनत घेतली आहे. बीड जिल्ह्यातील विविध प्रश्न मार्गी लागावेत व सर्व घटकांना न्याय मिळण्यासाठी आ. सुरेश धस यांना मंत्री करून बीड जिल्ह्याचे पालकमंत्री करावे अशी मागणी मराठा समाजाच्या वतीने तसेच जि प सदस्य तथा उद्योजक ॲड प्रकाश दादा कवठेकर यांनी केली आहे.




# शेतकऱ्यांना योजनांचा लाभ सुलभरितीने मिळण्यासाठी ॲग्रिस्टॅक योजना शेतकरी ओळख क्रमांकासाठी जिल्ह्यात १६ डिसेंबरपासून मोहीम

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : कृषि क्षेत्रात डिजीटल सेवांचा वापर करुन शासनाच्या विविध योजनांचा जलदगतीने व परिणामकारकरित्या लाभ देणे सुलभ व्हावे यासाठी राज्यात ॲग्रिस्टॅक योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक गावात सर्व शेतकऱ्यांचे शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) तयार करण्यात येत आहेत. नांदेड जिल्ह्यात यासाठी १६ डिसेंबरपासून मोहिम राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोहिमेच्या दिवशी उपस्थित राहून आपला शेतकरी ओळख क्रमांक प्राप्त करुन घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे.

शेतकरी ओळख क्रमांकामुळे शेतकऱ्यांना अपेक्षित फायदा होणार आहे. पीएम किसान योजनेअंतर्गत अनुदान प्राप्त करण्यासाठी आवश्यकतेच्या अटी पूर्ण करुन लाभ प्राप्त करण्यामध्ये सुलभता येणार आहे. यामुळे सर्व पात्र लाभार्थी समाविष्ट करुन घेण्यास सहाय्य मिळेल. पिकासाठी कर्ज मिळण्यासाठी किसान क्रेडिट कार्ड आणि कृषि इन्फ्रास्ट्क्चर फंड व शेतीच्या विकासासाठी इतर कर्जे उपलब्ध करुन घेण्यात सुलभता राहील. पिक विमा तसेच आपत्ती व्यवस्थापना अंतर्गत शेतकऱ्यांचे देय नुकसान भरपाईसाठी सर्वेक्षण करण्यात सुलभता येईल, किमान आधारभूत किंमतीवर खरेदीमध्ये शेतकऱ्यांचे नोंदणीकरण ऑनलाईन पध्दतीने होऊ शकेल.

शेतकऱ्यासाठी कृषि कर्ज, वित्त, निविष्ठा आणि इतर सेवा देणाऱ्या यंत्रणाना कृषि सेवा सहजपणे उपलबध करुन देता येईल. विविध सरकारी योजनांचा लाभ , कृषि व संलग्न विभागांना शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संचच्या उपलब्ध आकडेवारीच्या आधारे योजनांचा लाभ वितरीत करण्यामध्ये सुलभता येणार आहे. तसेच लाभार्थ्यांना वारंवार प्रमाणिकरणाची आवश्यकता राहणार नाही. शेतकऱ्यांना वेळेवर कृषि विषयक सल्ले, विविध संस्थाकडून संपर्क करण्याच्या संधीमध्ये वाढीसह नाविण्यपूर्ण कार्यक्रमांच्या विस्तार व प्रचारात सफलता प्राप्त होणार आहे.

तरी शेतकऱ्यांनी शासकीय योजनांचे लाभ प्राप्त करुन घेण्यासाठी आपल्या गावात मोहिमेच्या दिवशी शेतकरी ओळख क्रमांक प्राप्त करुन घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## आदर्श देवगाव या ठिकाणी खंडोबा यात्रा महोत्सवाचे आयोजन,

वडवणी प्रतिनिधी.



दरवर्षीप्रमाणे याही वर्षी खंडोबा यात्रा महोत्सवाचे आयोजन वडवणी तालुक्यातील आदर्श देवगाव या ठिकाणी केलेले आहे, शनिवार दिनांक ७,१२ ,२०२४ रोजी सकाळी आठ वाजता श्री खंडोबा लग्न समारंभ व तळी भंडरा कार्यक्रम होईल, व दुपारी चार वाजता गावची परंपरा असलेल्या गाड्या ओढण्याचा कार्यक्रम होईल, तसेच रविवार दिनांक ८,१२ ,२०२४, या दिवशी दुपारी एक ते चार या वेळेत जंगी कुस्त्याचा कार्यक्रम होईल, तरी पंचक्रोशीतील नागरिकांनी यात्रेतील कार्यक्रमाचा व कुस्त्याचा आनंद घ्यावा व उपस्थित राहण्याच आव्हान ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आला आहे,



**मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ना.अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. त्याबद्दल पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी भेट घेऊन सत्कार केला. यावेळी माजी नगरसेवक रविंद्र कदम हे उपस्थित होते.**

## मुख्यमंत्रीपदाच्या शपथेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची पहिली स्वाक्षरी वैद्यकीय मदतीच्या फाईलवर

### पुण्याच्या रुग्णाला पाच लाखांची मदत

**मुंबई। प्रतिनिधी** मुंबई,दि.५: मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी मुख्यमंत्र्यांनी पहिली स्वाक्षरी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या फाईलवर केली.पुणे येथील रुग्ण चंद्रकांत शंकर कु–हाडे यांना पाच लाखाची मदत मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून देण्याचे निर्देश त्यांनी फाईलवर दिले आहेत.चंद्रकांत कु–हाडे यांच्या पत्नीने बोन मॅरो ट्रान्सप्लांट उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अर्थसहाय्य देण्याची विनंती केली होती.

## शपथ घेताच मुख्यमंत्र्यांनी लाडक्या बहिणींना दिली आनंदाची बातमी; २१०० रुपये देणार



मुंबई : मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रालयात पत्रकार परिषद घेत आपली पुढची भूमिका स्पष्ट केली. मलाडकी बहीण योजनेफ्बाबतही मुख्यमंत्र्यांनी महत्त्वाची माहिती दिली. विधानसभा अध्यक्ष निवड, मंत्रिमंडळ विस्तार याबाबतही देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य केलं.

# श्री गुरुकृपा मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटलचा आज शुभारभ

बीड नव्याने सुरू होत असलेल्या श्री गुरूकृपा मल्टीस्पेशालिटी हॉस्पीट ॲन्ड रिसर्च सेंटरचा उद्घाटन समारंभ आज आयोजित करण्यात आला. ह.भ.प.नारायण महाराज गिरी व ह.भ.प.महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या हस्ते उद्घाटन होत असून या उद्घाटन सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन श्री गुरूकृपा हॉस्पीटलच्या वतीने करण्यात आले आहे.

जालना रोडवरील मंत्री बँकेच्या पाठीमागे आजपासून श्री गुरूकृपा मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल ॲन्ड रिसर्च सेंटर सुरू होत आहे. याचे उद्घायन आज सकाळी अकरा वाजता ह.भ.प.नारायण महाराज गिरी, ह.भ.प.महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या हस्ते होणार आहे. तरी या उद्घाटन समारंभाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन डॉ.अभिजित येवले, डॉ.निलेश मिसाळ, डॉ.बालाजी नवले, डॉ.प्रशांत ढाकणे, डॉ.एकतपुरे धनश्री , डॉ.प्रीतम लोध यांनी केले आहे.




दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार ६ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



# मी पुन्हा आलोच ...!

(संपादकीय) एकदा नव्हे तर दोन वेळा हातातोंडाशी आलेला मुख्यमंत्रिपदाचा घास सोडावा लागला तर एखाद्या नेत्याची अवस्था काय होऊ शकेल? या गोष्टीचा फायदा घेऊन एक तर त्याला राजकारणातून संपवला जाईल किंवा त्याला राजकिय संन्यास घ्यायला भाग पाडले जाईल. याच गोष्टी देवेंद्र फडणवीस यांच्या बाबतीतही करण्याचा अनेकदा प्रयत्न झाला. पण जिद्द, संयम आणि राजकीय डावपेचाच्या जोरावर फडणवीस तरले आणि राजकारणाच्या सारीपाटावर पुन्हा झळाळून उठले. ममी पुन्हा येईनफ असं म्हणणारे देवेंद्र फडणवीस खरोखरच पुन्हा आले आहेत. आज ते महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री म्हणून तिस–यांदा शपथ घेत आहेत.देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वाची झलक महाराष्ट्राला पुन्हा एकदा पाहायला मिळाली आहे. त्यांच्या नेतृत्वात एकट्या भाजपने १३२ जागा तर जिंकल्याचमहायुतीनेही २३४ ठिकाणी विजय मिळवला. पण ही कमाल काही पहिल्यांदाच नाही. तर देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वाखाली भाजपने २०१४, २०१९ आणि आता २०२४ साली, सलग तीन वेळा १०० हून अधिक जागा जिंकण्याची किमया केली. लोकसभेच्या निवडणुकीत फटका बसल्यानंतर फडणवीस संपले अशी चर्चा सुरू झाली होती. पण फडणवीसांनी चाणाक्ष खेळी करत अवघ्या चारच महिन्यात जोरदार कमबॅक केले. देवेंद्र फडणवीसांनामुख्यमंत्रिपदासाठी पाच वर्षांची वाट पाहावी लागली आहे. २०१९ साली पूर्ण बहुमत मिळालं असतानाही उद्धव ठाकरेंनी वेगळी भूमिका घेतली आणि फडणवीसांना विरोधी पक्षात बसावं लागलं. त्यावेळी विरोधी पक्षनेता म्हणून भाषण करताना देवेंद्र फडणवीस म्हणाले होते की, ममेरा पानी उतरता देख मेरे किनारे पर घर मत बसा लेना। मैं समंदर हूँ, लौटकर फिर आऊँगाफ आता तेच शब्द फडणवीसांनी खरे करून दाखवले. देशातील सर्वात तरुण महापौरपदाचा विक्रम हा देवेंद्र फडणवीसांच्या नावावर आहे. वयाच्या ४४ व्या वर्षी मुख्यमंत्री होणारे फडणवीस हे भाजपचे महाराष्ट्रातले पहिलेच मुख्यमंत्री ठरले आणि त्यांनी पाच वर्षेही पूर्ण केली.

२०१९ साली भाजप–शिवसेना युतीला बहुमत मिळाल्यानंतरही मुख्यमंत्रिपदावरुन बिनसलं आणि उद्धव ठाकरे हे महाविकास आघाडीसोबत गेले. महाविकास आघाडी सरकार हे अडीच वर्षे टिकलं.अजित पवार यांच्यासोबत पहाटेच्या शपथविधीचा प्रयोग फसल्यानंतर देवेंद्र फडणवीस हे अधिक सजग झाले आणि त्यांनी ताकही फ ुंकून प्यायला सुरुवात केली. त्या काळात हताश न होता देवेंद्र फडणवीसांनी आपलं काम सुरूच ठेवलं. ममी पुन्हा येईनफ असं म्हणणा–या देवेंद्र फडणवीसांनी उद्धव ठाकरेंचे महाविकास आघाडी सरकार पाडण्याचा जास्त काही प्रयत्न केला नाही. अंतर्गत बंडाळीमुळे महाविकास आघाडी सरकार पडेल असं फडणवीस सातत्याने म्हणायचे. विरोधी पक्षनेते म्हणून देवेंद्र फडणीसांनी जे काम केलं त्याला तोड नव्हती. कोरोना काळात त्यांनी अनेक दौरे केले, अनेक ठिकाणी भेटी दिल्या. जनतेमध्ये थेट जायला प्राधान्य दिलं. त्याची चर्चा जरी जास्त झाली नसली तरी देवेंद्र फडणवीसांनी आपलं काम सोडलं नाही. विरोधी पक्षनेते असतानाही देवेंद्र फडणवीसांनी संयम सोडला नाही. जून २०२२ साली झालेल्या राज्यसभा निवडणुकीत पहिल्या आणि दुस–या पसंतीक्रमाचा असा काही प्लॅन केला की कुणाच्या ध्यानीमनी नसतानाही भाजपचे धनंजय महाडिक निवडून आले. त्यावेळी एकत्रित शिवसेनेच्या संजय पवारांचा पराभव झाला. संख्याबळ नसतानाही त्यांनी भाजपचा खासदार निवडून आणला. त्यावेळी खुद्द शरद पवारांनीही फडणवीसांचे कौतुक केलं होतं. देवेंद्र फडणवीसांनी अनेकांना आपलसं केलं, अनेक लोकांशी जोडून घेतलं असं पवार म्हणालेहोते. त्याच रात्री शिवसेनेच्या एकनाथ शिंदे यांनी बंड केलं आणि सूरतमार्गे गुवाहाटीची वाट धरली. त्यानंतर राज्यातली सत्ता बदलली आणि महायुतीचे सरकार सत्तेत आलं. एकनाथ शिंदे यांना आपल्यासोबत घेतल्यानंतर पूर्ण संख्याबळ असतानाही, संधी असतानाही देवेंद्र फडणवीसांची मुख्यमंत्रिपदाची संधी पुन्हा हुकली. त्यावेळी कमी आमदार असतानाही एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रिपद मिळालं आणि देवेंद्र फडणवीसांना उपमुख्यमंत्रिपद घ्यावं लागलं. अडीच वर्षानंतर पुन्हा एकदा संधी असतानाही मुख्यमंत्रिपद हातून निसटलं. ही देवेंद्र फडणवीसांच्या संयमाची पुन्हा एकदा परीक्षा होती. एकीकडे एकनाथ शिंदेंना सोबत घेतल्यानंतर शिवसेना पक्ष फोडल्याचा आरोप फडणवीसांवर होत होता. तर त्याचवेळी अजित पवारही फडणवीसांच्या सोबतीला आले. वेगळ्या विचारधारेच्या पक्षाला सोबत घेतल्यानंतर देवेंद्र फडणवीसांवर मोठी टीका झाली. पण देवेंद्र फडणवीस यांनी भविष्याचा विचार केला आणि आपल्या निर्णयावर ठाम राहिले. देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वात लढलेल्या लोकसभेच्या निवडणुकीत राज्यात महायुतीला मोठा झटका बसला. मिशन ४५ प्लस असं ध्येय ठेऊन उतरलेल्या भाजपची धूळदाण उडाली आणि केवळ १७ जागा पदरात पडल्या. त्यातही भाजपला केवळ ९ जागा मिळाल्या. त्यामुळे फडणवीसांचे नेतृत्व संपले, राजकारण संपलं अशी दबक्या आवाजात चर्चा सुरू होती. अजित पवारांना सोबत घेतल्याने ही अवस्था झाली अशी देवेंद्र फडणवीसांवर टीका सुरू झाली. त्या काळात शांतपणे मायक्रो मॅनेजमेंट केलं आणि विधानसभेला मतांची सुनामी आणली. आपल्याला चाणक्य का म्हणतात याची प्रचितीच देवेंद्र फडणीसांनी दिली. उपमुख्यमंत्री म्हणून काम करताना देवेंद्र फडणवीसांनी भाजपची कशी वाढ होईल याचा विचार केला. त्याचाच फायदा भाजपला निवडणुकीत झाल्याचं दिसून येतंय. भाजपने त्यांच्या इतिहासातील सर्वाधिक जागा तर जिंकल्याच, पण महायुतीतील इतर पक्षांचे आमदारही निवडून आणले. ममी पुन्हा येईनफ म्हणणारे देवेंद्र फडणवीस आता पुन्हा आले आहे आणि तेही एकहाती बहुमत घेऊन. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाची संधी मिळाल्यानंतर आता त्यांचे हेच एकहाती नेतृत्व पुन्हा एकदा दिसणार आहे.

# सणासुदीला लाईट गेल्यास, महावितरणचे तीन तेरा वाजवणार

**नमस्कार, मी रुपाली देशपांडे**

**मला थोडेसे खरंतर थोडेसे नाहीच बरेच बोलायचे ते हि ब-याच विषयावर. असो. आता दिवाळी होऊन गेली. लक्ष्मीपूजन ला संध्याकाळी पूजेच्या वेळेतच सर्व लाईट्स गेले. नंतर लगेच १ मिन लागायची अन परत जायची.**

**असे हे का घडले याचा विचार आपण केला का? समाज शांत,थंड कोणी काहीच बोलले नाही आणि पुढे काही करायचे धाडस हि नाही. वर्षभरातील सर्व महत्वाच्या सणाला घरात बाहेर सगळी कडे अंधार. खरंतर, समाजात, मनात आणि आपल्या डोक्यात सगळीकडे भयानक अंधार काळोख दिसला.पुढे काय? या प्रश्नाचे उत्तर हि अंधारात दिसले.आपण थोडे थोड्या गोष्टीला रस्त्यावर उतरतो, आंदोलन करतो.एखादा विषयला बंद पुकारतो, मधेच शाळा कॉलेजस सोडायला लावतो. उठसुठ प्रवासाच्या डढ फोडतो, सार्वजनिक माल मत्येतेच नुकसान करतो. मग हाच समाज सणावारात लाईट्स जातात मग शांत का बसतो आपल्या पैकी काही जणांना आठवत असेल की कित्येक वेळेला लाईट जाण्याचे प्रसंग आपण पहिले २६ जानेवारी आणि १५ ऑगस्ट ला बरोबर सकाळीच लाईट जात असे.**

**गौरी महालक्ष्मी येतात त्या वेळेस हि घरात अंधार, महालक्ष्मी जेवतात त्याच दिवशी अंधार, दस-याच्या दिवशी ऐन संध्याकाळी सिमोलघणं च्या वेळेस ही तेच. आता खरेतर अंधार घरात होण्यापेक्षा आपल्या डोक्यात, मनात, विचारात अंधार आहे. आपण यावर राग काढतो पण हाच राग समाजाणे रसत्यावर उतरून का काढत नाही? असे का होते हे जाब विचारत नाही. आपले रक्त इतके थंड का?**



**या साठी जेंव्हा रस्त्यार उतरले जाईल त्या वेळेस सर्व यंत्रणा जाग्या होतील, शासन, प्रशासन, राजकीय पक्ष, समाजिक संस्था,अनेक समाजिक यंत्रणा या जाग्या होतील त्या वेळेस ख-या अर्थाने आपल्या मनातील अंधाकर जाईल. आपल्या तील काही तरुण मंडळी, कॉलेज ची मुले या जाग्या झाल्या तर खूपसं समाजिक रूप बदलेल. आपण सर्व जागे झालोत तर अनेक दैनंदिन गोष्टी सुरळीत होतील. पण यासाठी आपण जागे राहणे आवश्यक आहे.**

**महाराष्ट्र विजपुरवठा चे खाजगी करण झाले, भरमसाठ लाईट बिल येते सामान्य माणसाचे कधी कधी पगार हि होत नाही तेवढा.**

**परत यांचे मार्च महिन्यातील नखरे ज्यादा बिल काढतात परत हेच लोक म्हणतात येतेच या महिन्यात अरे बाबांनो पण कसे ते तर सांगा.**

**खाजगी करण तुमचे झाले आता बाकी सगळी कसरत आमच्या जीवावर का?**

**बर खाजगी करण झाले असले तरी त्यात काम करणारे कामगार तर याच समाजाचे घटक आहेत मग तरी असे का.की याचे हि खाजगी करण होऊन आपली संस्कृती आणि आपले सणवारचे महत्व विसरले का?**

**अश्या वेळेस अनेक कारणे महावितरण पुढे करते, व जिळाली, शॉट सर्किट झाले कनेक्शन लूज होते. खरे तर आपण जागे होऊन याचे कनेक्शन लूज करू शकतो. पण आपण लोक थंड,शांत,कुणाशी कोणाला काही घेणे देणें नाही.प्रत्येक सणाला लाईट का जाते हा जाब विचारला पाहिजे.**

**हिच वेळ आहे आपण जागे होण्याची आणि या लोकांना जागे करण्याची. मी तर जागी आहेच. पण तुम्ही ही व्हावे *महावितरनाणे एकच ध्यानात घावें माझी तुम्हला नम्र विनंती की प्रत्येक सणाला लाईट राहू देत आणि असेही लाईट राहिली नाही तर या वेळेस याद राखा मी एकटी नाही पूर्ण बीड शहर सोबत घेऊन येईल तुमच्या ऑफिस मध्ये. मग पाहू नेमकी कोणतती व गेली अन कुठे शॉर्ट सर्किट झालं.**

**जागे व्हा, संघटित व्हा.निर्णय घ्या आणि जिवंत व्हा**

**संपर्क -**

**रुपाली देशपांडे**

# विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या विश्वव्यापी कार्याचा सुक्ष्म आढावा

**आदरांजली भिमरायाला...भावांजली विश्वरत्नाला**

----

करोडो भारतीयांच्या जीवनमानात आमूलाग्र बदल घडवून आणणार्या नेत्यांमध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्थान विश्वस्तरीय आहे.

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करून कोटी–कोटी भारतीयांचे अंधकारमय जीवन लक्ष–लक्ष किरणांनी प्रकाशित केले.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर द्वारा लिखित भारतीय राज्यघटनेमुळे आज भारत देश एकात्मिक,अखंड असुन भारत देश एक संघ आहे तसेच राज्यघटनेतील तरतुदीमुळेच भारतात कधीही हुकूमशाही आली नाही. बाबासाहेबांनी प्रत्येक भारतीयांच्या विकासासाठी समान संधी आणि मुलभूत अधिकार देवून देशाला प्रगतीपथावर नेण्यात मोलाचा वाटा उचलला आहे.

राज्यघटनेतील मूलभूत हक्क,कर्तव्ये, त्रिस्तरीय पंचायत राज मधून सर्वसामान्यांना सत्तेत सहभागीत्व, वंचितांना संधीची उपलब्धता, राज्य आणि केंद्र यामधील सुयोग्य समन्वय ही राज्यघटनेची उपायुक्तता वाढविणारी आहेत.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राज्यघटनेतील कायदा व सुव्यवस्था राखणा–या कलमांमुळेच देशात शांतता आणि सुरक्षितता आहे,अन्यथा विविध धर्मीय–जातीय–पंथीय मतभिन्नता असलेला देश केंव्हाच सीरिया प्रमाणे अराजक,अफगाणिस्थान प्रमाणे तालिबानी झाला असता.आपल्या देशात अराजकता निर्माण झाल्यास देशात किती भयावह स्थिती निर्माण होईल,याचा विचारही गर्भगिळीत करणारा वाटतो.देशात शांतता, सुरक्षितता आणि अखंडता कायम आहे ती विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानामुळेच! सामाजिक जीवनात २० जुलै १९२४ रोजी बहिष्कृत हितकारिणी सभा ,१९२७ रोजी चवदार तळ्याचा सत्याग्रह ,१९३०रोजी नाशिकच्या काळाराम मंदिर सत्याग्रहातून अस्पृश्यांमध्ये स्वसन्मानाची ज्योत जागवली.बाबासाहेबांनी ८ जुलै १९४५ रोजी पिपल्स एज्युकेशन सोसायटी ची स्थापन करून करोडो बहुजनांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली.

१५ ऑगस्ट १९३६ रोजी स्वतंत्र मजुर पक्ष ,१९ जुलै १९४२ रोजी शेड्यूल कास्ट फेडरशन आणि १९५५ ला प्रस्तावित रिपब्लिकन पक्षाद्वारे राजकीय क्षेत्रात पायाभरणी केली.१४ऑक्टोबर १९५६ रोजी आपल्या लाखो अनुयायांसह धर्मांतर करताना बाबासाहेबांनी समतावादी , मानवतावादी ,विज्ञानवादी बौद्ध धम्म भारतात पुर्नस्थापित करून देशातील संभाव्य धार्मिक यादवी टाळली.भारतीय अर्थव्यवस्थेला मार्गदर्शक ठरणारे अर्थशास्त्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते हे आज आपल्या लक्षात आले पाहिजे तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बहुजनांच्या–स्त्रीयांच्या हक्कासाठी १९५२ साली आपला कायदेमंत्री पदाचा राजीनामा देणारे डॉ बाबासाहेबच होते,२४ तासापैकी २० –२० तास अध्ययन करून विद्येची अखंड सेवा करणारे आंबेडकर ,राज्यघटनेच्या ४५ व्या कलमान्वये १४ वर्षाखालील बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा करणारे शिक्षणतज्ञ म्हणजे डॉ.आंबेडकर,मूकनायक,बहिष्कृत भारत,जनता,प्रबुद्ध भारत सारखे समाजमन पेटविणारे वृत्तपत्र चालविणारे एक झुंजार पत्रकार ,जगातील सर्वात मोठ्या संसदीय शासन प्रणालीचे प्रणेते ,एक जहाल अभ्यासू वक्ता , शेकडो वैचारिक पुस्तके लिहणारे एक मर्मभेदि जागतिक दर्जाचा लेखक ,भारतीय जलनीतीचे संकल्पक आणि कुटुंब नियोजनचे प्रवर्तक , शेतकरी–शेतमजूर–कामगारांचे नेते, धार्मिक,सामाजिक , आर्थिक,राजकीय, शैक्षणिक,कृषी,आद्योगिक साहित्यिक क्षेत्रात अत्युच्च कार्य करणारा यशस्वी नेता म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर ....... ही न संपणारी विश्वव्यापी कार्याची यादी आहे. संपूर्ण भारतीयांसाठी आपले जीवन चंदनासम झिजविणा–या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ६८ व्या महापरिनिर्वाणा निमित्त भावपूर्ण आदरांजली ! मुंबईच्या अरबी समुद्राच्या किनारी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अंत्यविधी लाखो डोळ्यातून वाहणा–या अश्रूंच्या आणि लाखो विदीर्ण हृदयातून उठणा–या कंपनाच्या साक्षीने पार पडला.चैत्यभूमीला स्पर्श करणा–या अरबी सागराला भावनिक साद घालतांना भीमकवी प्रल्हाद शिंदे लिहतात,

अरे सागरा,अरे सागरा ! भीम माझा इथे निजला,शांत हो जरा !!


**संकलन व लेखन :-**

**श्री बाजीराव नवनाथ ढाकणे ,**

**बीड जिल्हा समन्वयक, महाएनजिओ फेडरेशन, महाराष्ट्र राज्य ,तथा ,बीड जिल्हा समन्वयक, लेक लाडकी अभियान ,महाराष्ट्र राज्य**

**मो ९४२११९८९९०९**


# येणाऱ्या सरकारपुढील आव्हाने!

विधानसभा निवडणुकीत भाजपच्या विजयाचा आकार इतका आहे की एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार या दोन उपमुख्यमंत्र्यांसही फडणवीस यांच्या हातास हात लावून ङ्गममम म्हणण्याखेरीज फार काही करण्यास वाव राहणार नाही. एव्हाना या दोघांनाही भाजपचे नेतृत्व ही काय चीज आहे याचा पुरेसा अंदाज आलेला असणार. या दोघांचेही मागे वा अन्य कोठे जायचे दोर आता कापले गेलेले आहेत. त्यामुळे पदरात पडेल ते त्यांस गोड मानून घ्यावे लागणार. त्यास इलाज नाही. या दोन पक्षांच्या राजकारणावर गेल्या काही दिवसांत पुरेसे भाष्य झालेले आहे. त्यामुळे पुनरुक्तीची गरज नाही. बाहेरच्या पक्षांतील अनेकांस भाजपत आणले आणि स्वत:चा समर्थक–पाया तयार केला. या उपायाने त्यांना पक्षांतर्गत स्पर्धकांवर मात करण्यात यश आले, हे खरे. पण त्यामुळे फडणवीस यांच्या राजकीय चारित्र्यावरही चार शिंतोडे उडाले. त्या काळात त्यांच्या आसपास जमलेली प्रभावळ इतकी दिव्य होती की हाच का तो संस्कारी भाजपचा संस्कारी नेता, असा प्रश्न पडावा. बारा पक्षांचे पाणी प्यायलेले आणि विविध पातळ्यांवरील ङ्गदुकानदारीफ साठी कुख्यात अनेक जण फडणवीस यांस लोंबू लागल्याने त्यांचे भले झाले असेल; पण फडणवीस यांस बदनामीचा भार सहन करावा लागला. ते तसे होणारच होते. पण टाळता आले असते तर फडणवीस यांची कारकीर्द तेव्हा अधिकच उजळती. कदाचित तेव्हा तसे करणे ही त्यांची राजकीय अपरिहार्यता असावी. आता ती नाही. त्यामुळे गेल्या खेपेस उचलावे लागलेले चुकीचे पाऊल या वेळी आपल्याकडून पडणार नाही, याची खबरदारी त्यांस घ्यावी लागेल. नेता असो वा सामान्य व्यक्ती. अंतिमत: त्याची प्रतिमा त्याची संगत ठरवत असते. तेव्हा या वेळी फडणवीस यांस असंगांशी संग टाळावा लागेल. तसे काही करावे लागण्याची अपरिहार्यता या वेळी नाही. कारण पक्षांतर्गत आणि पक्षाबाहेरही फडणवीस यांनी आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध करून दाखवलेले आहे आणि त्यांना आता पक्षात स्थानिक पातळीवर तरी आव्हानवीर/ स्पर्धक नाही. त्यात मध्यंतरीच्या काळात जे झाले, जे त्यांना सहन करावे लागले यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने या वेळी फडणवीस यांच्या पाठिंब्यासाठी कंबर कसली. संघाचा आधार नसल्यावर आणि असल्यावर काय होते या प्रश्नाचे उत्तर लोकसभा आणि विधानसभा निवडणूक निकालात मिळते. ते स्पष्ट आहे. हा संघाधार या वेळी अधिक स्पष्ट झालेला असल्याने आणि तो कोणास आहे हेही लपून राहिलेले नसल्याने फडणवीस यांच्यासाठी आगामी काळ पक्षांतर्गत पातळीवर निष्कंटक असेल यात शंका नाही. त्यांच्यासमोर या वेळी आव्हान असेल ते राज्याची प्रतिमा सुधारण्याचे. फडणवीस यांच्या पहिल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात नाणार येथे येऊ घातलेला भव्य तेलशुद्धीकरण प्रकल्प शिवसेनेच्या विरोधामुळे त्यांना आणता आला नाही. तेच वाढवण बंदर प्रकल्पाबाबतही घडले. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेस चुचकारण्याच्या नादात फडणवीस या प्रकल्पांच्या आघाडीवर काहीही करू शकले नाहीत. आता फडणवीस यांच्यामागे ङ्गअधिकृतफ शिवसेना आहे. तेव्हा अन्यांची फारशी फिकीर त्यांना बाळगण्याचे कारण नाही. महाराष्ट्र अजूनही गुंतवणूकयोग्य आणि गुंतवणूक स्पर्धेत आहे हे चित्र नव्याने निर्माण करण्याची जबाबदारी फडणवीस यांची. गुजरात, कर्नाटक, आंध्र वा तमिळनाडू आदी राज्यांच्या तुलनेत मध्यंतरी महाराष्ट्र चांगलाच मागे पडला असल्याचे चित्र निर्माण झाले. ते किती खरे, किती खोटे याची चर्चा करण्यात अर्थ नाही. कारण सध्याचा ङ्गआभास हेच वास्तवफ असे मानले जाण्याचा काळ. त्यामुळे महाराष्ट्र स्पर्धेत नाही असे चित्र निर्माण झाले असेल तर त्याच्या खऱ्या खोट्याची सत्यासत्यता न करता ते बदलण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. हे चित्र बदलणे हे खरे डोंगराएवढे आव्हान. फडणवीस यांना या खेपेस ते पेलावे लागेल. महाराष्ट्राचे असे प्रतिमा–हनन हे अंतिमत: देशालाही परवडणारे नाही. हे आव्हान वाहताना प्रश्न असेल तो राज्याच्या खंक होत चाललेल्या तिजोरीचा. ङ्गलाडकी बहीणफ वगैरे कौतुक निवडणुकीपुरते (च) ठीक. त्यांना सध्या दिली जात असलेली १५०० रुपयांची मासिक भाऊबीज सुरू ठेवणे अवघड. पण त्यात जर आणखी ६०० रु. प्रति महिना अशी वाढ करावयाची असेल तर राज्याच्या तिजोरीस पडलेल्या छिद्राचे भगदाड होणार हे निश्चित. ते बुजवता आले नाही तर त्याचे पातक लवकरच माजी होणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे वा माजी आणि आजीही अर्थमंत्री अजितदादा पवार यांच्या डोक्यावर फुटणार नाही. त्यासाठी जबाबदार धरले जाईल ते मुख्यमंत्री फडणवीस यांनाच. त्यामुळे राजकीय कसरत करता करता फडणवीस यांस या ंनिवडणुकीयखर्चाचीही तजवीज करत राहावी लागेल

# बांगलादेशातील हिंदूवरील हल्ले थांबणार तरी केंव्हा ?

५ ऑगस्टला बांगलादेशात शेख हसीना यांचे सरकार पडल्यानंतर तेथे मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला. दंगली झाल्या, प्रचंड प्रमाणात जाळपोळ झाली. शेख हसीना यांनाही देश सोडून भारतात पलायन करावे लागले. सुरुवातीला आपापसांतील वाटणारा हा वाद हळूहळू तेथील हिंदूंच्या दिशेने वळला. स्थानिक हिंदूंना जाणीवपूर्वक लक्ष केले जाऊ लागले, हिंदूंना घरात घुसून मारहाण होऊ लागली, त्यांची घरे, दुकाने लुटून ती जाळण्यात येऊ लागली, त्यांच्या जमिनी हडपण्यात आल्या, त्यांना त्यांच्याच घरातून हाकलले जाऊ लागले. हिंदूंच्या मंदिरांवर हल्ले होऊ लागले, देवतांच्या मूर्तींची तोडफोड होऊ लागली, हिंदू स्त्रियांवर, बालकांवर अत्याचार होऊ लागले. ऑगस्ट महिन्यात देशभरात पसरलेले हे हिंदुविरोधी लोण आजही कायम आहे. नव्या सरकारचे या दंगेखोरांना अभय असल्याने मागील चार महिन्यात हिंदूवरील हल्ले काही थांबलेले नाहीत. बांगलादेशाचा ८० टक्के भाग हा पूरग्रस्त आहे त्यामुळे दरवर्षी पावसाळ्यात या ठिकाणी पूर येतो. यंदा आलेला पूर हा अत्यंत भीषण होता, ज्यामध्ये ५० लाखाहून अधिक नागरिकांचे स्थलांतर करावे लागले होते. नागरिकांच्या खाण्यापिण्याचे हाल झाले होते अशा प्रतिकूल परिस्थितीत देशातील अनेक हिंदू संघटनांनी पूरग्रस्तांना मदत करण्याचे काम केले. त्यांतील एक इस्कॉन या हिंदूंच्या संघटनेने पूरग्रस्तांना प्रतिदिन मोठ्या प्रमाणात अन्नदान करण्याचे कार्य केले. अन्नदान करताना पूरग्रस्त हे मुसलमान आहेत कि हिंदू आहेत हे न पाहता निस्वार्थ भावनेने त्यांनी अन्नदानाची मोहीम देशभर राबवली. कोरोना काळात जेव्हा साऱ्या जगभरातील दळणवळण थांबले होते तेव्हाही बांगलादेशातील इस्कॉन संघटनेने तेथील नागरिकांना अन्न पुरवण्याचे काम केले. धार्मिक भेदभाव न ठेवता मानवतावादी दृष्टिकोनातून सातत्याने लोकांच्या साहाय्यासाठी धावणाऱ्या इस्कॉनवर बांगलादेशात आज मात्र धार्मिक कट्टरतावादी संघटना असल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. इस्कॉनचे स्वामी चिन्मय कृष्णदास ब्रह्मचारी यांना अटक करून त्यांच्यावर देशद्रोहाचा खटला भरण्यात आला आहे. इस्कॉनने देशवासीयांवर केलेल्या उपकाराची जाण न ठेवता ती केवळ एक हिंदू संघटना आहे म्हणून तिच्यावर बंदी घालण्यास निघालेलया बांगलादेशला आणि तेथील स्थानिक नागरिकांना संकटकाळात मदत करून इस्कॉनने काही चूक केली का ? असा सवाल आज भारतभरात विचारला जात आहे. स्वामी चिन्मय कृष्णदास ब्रह्मचारी यांच्या अटकेमुळे भारतातील हिंदू संघटना आक्रमक झाल्या असून त्यांच्या सुटकेसाठी आणि बांगलादेशातील हिंदूवरील हल्ले थांबवून त्यांच्या सुरक्षेसाठी भारत सरकारने लवकरात लवकर ठोस पावले उचलावीत अशी मागणी आंदोलने, निवेदने, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स यांवरून केली जात आहे. १९४७ सालच्या अखंड भारताच्या फाळणीमध्ये पूर्व आणि पश्चिम अशा दोन भागात पाकिस्तानची निर्मिती झाली. त्यातला पूर्व भाग हा आजचा बांगलादेश म्हणून ओळखला जातो. तत्कालीन पूर्व पाकिस्तानाची भाषा बंगाली, तर पश्चिम पाकिस्तानात उर्दू भाषेचा वापर होत होता. भाषा आणि इतर काही प्रश्नामुळे पूर्व पाकिस्तानातील जनतेचा असंतोष वाढत गेला. हा असंतोष मोडून काढण्यासाठी पाकिस्तान सरकारने लष्कर पाठविले आणि तेथे लष्करी कायदा लागू केला. ज्यामुळे बांगलादेशमध्ये हाहाकार पसरला, अखेर भारताने यामध्ये हस्तक्षेप पूर्व पाकिस्तानातील नागरिकांना संरक्षण दिले आणि १९७१ मध्ये बांगलादेश या स्वतंत्र देशाची निर्मिती केली. आज हे सारे उपकार बांगलादेश विसरला आहे. १९४७ साली पूर्व पाकिस्तानमध्ये म्हणजे आताच्या बांगलादेशमध्ये एक तृतीयांश हिंदू होते. २०२२ मध्ये जेव्हा देशात जनगणना झाली तेव्हा तेथे ७.९६ टक्के हिंदू शिल्लक राहिल्याची अधिकृत आकडेवारी जाहीर करण्यात आली आहे. फाळणीनंतर तेथील हिंदूंची संख्या कमी होत गेली तर मुस्लिमांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत गेली. फाळणीपासूनच स्थानिक अल्पसंख्य हिंदूंना लक्ष केले जात आहे, स्थानिकांच्या छळाला कंटाळून दरवर्षी लाखो हिंदू देशातून पलायन करतात.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

शुक्रवार ६ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



## बिबट्यासह वन्य प्राण्यांपासून शेतकऱ्यांच्या जीवितास धोका

### कृषी पंपाला दिवसाचा विजपुरवठा करा अन्यथा तीव्र आंदोलन करू! - राजेभाऊ फड



**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

स्वतःचा जीव धोक्यात घालत अवघ्या जगाचे पालनपोषण करणा–या बळीराजाच्या भोवती अनेक संकटे घोंगावत असतात. कधी कृत्रिम अडचणी येतात तर कधी कधी नैसर्गिक धोके निर्माण होतात. परळी तालुक्यात अनेक ठिकाणी बिबट्यासह अनेक वन्य जीवांचा मुक्त वावर असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यांच्यापासून हल्ले होण्याच्या शक्यता नाकारता येत नाहीत. त्यामुळे वारंवार संकटाशी खेळणा–या शेतक–यांना शासनाने दिवसाचा विजपुरवठा करावा जेणेकरून त्याच्यावरील अपघाताचे घोंगावणारे संकट दूर होऊ शकेल. शासनाने आणि विजवितरण कंपनीने याचा गंभीर्यपूर्वक विचार करावा अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी दिला आहे.

अस्मानी आणि सुलतानी संकटाचा नेहमीच शेतक–यांना सामना करावा लागतो. कमी असलेला हमीभाव, कधी दुष्काळ तर काढू अतिवृष्टी अशा या ना त्या कारणाने नेहमीच संकटे घोंगावत असतात. त्यातच शासनाने आता रात्रीचा विजपुरवठा सुरु केला आहे. रात्रीच्या वेळी वन्य प्राण्यांचा वावर असतो. साप, विंचू, रानडुक्कर तसेच काही ठिकाणी बिबट्याचा मुक्त संचार असल्याच्या घटना निदर्शनास येत आहेत. त्यांच्यापासून शेक–यांना धोका निर्माण झाला आहे. अशातच रात्रीच्या वेळी पिकाला पाणी देण्यासाठी शेतात गेलेल्या शेतक–यांवर ते हल्ले करत असल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्यात अनेकांना आपला आपला जीव गमवावा लागला तर अनेकांना कायमस्वरूपी अपंगत्व आले आहे. या घटना टाळव्यात यासाठी शासनाने दिवसा विजपुरवठा करावा अन्यथा महावितरण कंपनीच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी दिला आहे.

## राज्यस्तरीय आहे शालेय कबड्डी स्पर्धेत क्रीडा प्रबोधिनी संघाने सुवर्ण मुकुट.



**जालना प्रतिनिधी :-**क्रीडा व युवक सेवा संचालक महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय ठाणे यांच्या संयुक्त विद्यम ाने आयोजीत तालुका क्रीडा संकुल कोपरी जिल्हा ठाणे येथे सुरू असलेल्या राज्यस्तरीय १७ वर्षाखालील शालेय मुलींच्या कबड्डी स्पर्धेत जिल्हा परिषद निवासी क्रीडा प्रबोधिनी च्या मुलीच्या संघाने संपूर्ण स्पर्धेवर वर्चस्व गाजवत पहिल्या फेरीत कोल्हापूर संघाला १ गुणाने हरविले तर उपांत्य फेरीत मुंबई संघाला एकतर्फी २५ गुणांनी हरवून अंतिम फेरीत प्रवेश केला व अंतिम फेरीत संपुर्ण सामन्यात वर्चस्व गाजवत नाशिक संघाला १५ गुणांनी हरवीले व सुवर्ण पदकाची ची कमाई केली. विजय संघात अक्षरां अंभुरे, राणी भुजंग, म ोनिका पवार, कल्याणी शिंदे, नंदा नागवे, भाग्यश्री गायकवाड, साक्षी शिंदे, दीक्षा शिंदे,आरती डिघे, मुयुरी टकले, वैष्णवी शेवत्रे व पूजा गाडे यांचा समावेश होतो. या संघाला प्रशिक्षक श्री रविंद्र ढगे, श्री गणेश ढगे, संतोष मोरे,अमोल चव्हाण, प्रियंका येळे व जिल्हा परिषद निवासी क्रीडा प्रबोधिनीचे व्यवस्थापक श्री.प्रमोदजी खरात यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व विजय खेळाडूंचे जालना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, मुख्य लेखा व वित्त अधिकारी राजु सोळुंके साहेब, शिक्षणाधिकारी श्री कैलाश दातखीळ साहेब, उपशिक्षणाधिकारी शाम देशमुख साहेब, प्रशासकीय अधिकारी श्रीमती विनया वडजे मॅडम, प्रशासकीय अधिकारी श्री प्रभाकर शिंदे, लेखाधिकारी साहेब व भाऊसाहेब नेटके यांनी अभिनंदन केले.

## कोठारी येथे मूर्ती स्थापना व कलशारोहण सोहळा सतत तीन दिवस महाप्रसादाचे आयोजन



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

किनवट : कोठारी (चि) येथे हनुमान मूर्ती स्थापना व मंदिर कलशारोहण सोहळा दिनांक ६–७ व ८– डिसेंबर रोजी आयोजित केला आहे. तीनही दिवशी कीर्तन भजन असे विविध धार्मिक कार्यक्रम व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.यामध्ये शुक्रवार दि.६ डिसेंबर रोजी सकाळी ७ वाजता

श्री गणपती पुजन, पुण्य वचन, श्री मातृका पूजन वसोरधारा पुजन, पंचगण्य पुजन, धर्मध्वज पुजन गोपुजा, आचार्यवर्णम श्री योगीनी मंडल पुजन सहित वास्तुदेवता स्थापन, धान्यादिवास फलादिवास, जलादिवास, प्रवेश यज्ञ प्रतिष्ठा.शनिवार, दि.७–डिसेंबर रोजी सकाळी ७.३१ वा.नवग्रह स्थापन, मुख्यदेवता स्थापन, मूर्तीप्राणप्रतिष्ठा सहित कलशारोहण, ईशान्य रुद्रपुजन, नवग्रह देवता हवन, स्थापित देवता हवन, वलिदान पुजन, ह.भ.प. श्री प्रशांत, आकाश जोशी महाराज गोकुदा यांच्या शुभहस्ते रविवार, दि.८–डिसेंबर रोजी कलशारोहण नगर प्रदक्षिणा सकाळी ७ ते ९ पर्यंत. सकाळी ११.३१ वा. कलशारोहण व मुती स्थापना ह.भ.प.श्री नारायण महाराज माधापुरकर बालयोगी श्री गंगेश्वर महाराज (सोमेवर मठ संस्थान, मदनापुर) यांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे.किर्तन सोहळा :– शुक्रवार, दि.६–डिसेंबर रोजी भजन सोहळा ह शनिवार, दि.७–डिसेंबर रोजी रात्री ९ ते ११ ह.भ.प.श्री शिवाजी वटवे देवाची आळंदी यांचे किर्तन रविवार, दि.८–डिसेंबर रोजी दुपारी १.३० ते ३.३० ह.भ.प.श्री नारायण महाराज माधापूरकर यांचे किर्तन तर कलशारोहणानंतर लगेच लेकीबळींचा सत्कार सोहळा ही गावक–यांच्या वतीने करण्यात येणार आहे.कोठारी व परिसरातील भावीक भक्तांनी उपस्थित राहून मूर्ती स्थापना कलशारोहण कीर्तनाचा व महाप्रदाचा लाभ घेण्याचे आवाहन समस्त गावकरी मंडळी कोठारी (चि) यांनी केले आहे.

## महावितरणच्या अनागोंदी कारभाराविरोधात लिंबागणेश येथे रास्तारोको ; कमी दाबाने व वारंवार वीजपुरवठा खंडित रब्बी पिके धोक्यात :- डॉ.गणेश ढवळे

–लिंबागणेश:– ( दि.०५) बीड तालुक्यातील लिंबागणेश पंचक्रोशीतील गावांना विद्युत पुरवठा असणा–्या लिंबागणेश येथील ३३ केव्ही उपकेंद्रातील अनागोंदी कारभारामुळे विजेच्या समस्येने तिव्र रुप धारण केले असुन दिवसभरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने तसेच कमी दाबाचा वीजपुरवठा होत असल्याने मुबलक पाणी उपलब्ध असुनही वीजे अभावी शेताला पाणी देता येत नसल्याने रब्बी हंगामातील कांदा ज्वारी,गहु, हरभरा आदी पिके वाळु लागल्याने शेतक–्यांना हातची पिके वाया जाण्याची धास्ती असुन लिंबागणेश येथील ३३ केव्ही.उपकेंद्रातील उप अभियंता पद २ महिन्यांपासून रिक्त असुन लाईनमन वेळेवर ड्युटी करत नसल्याने तसेच मुख्यालयी रहात नसल्याने रात्री अपरात्री ग्रामस्थांना फ्युज टाकणे,केबल बदलणे आदी कामे करावी लागत असुन महावितरणच्या अनागोंदी कारभार विरोधात आज दि.५ सकाळी गुरुवार रोजी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली अहमदपूर ते अहमदनगर ५४८ डी राष्ट्रीय महामार्गावरील मांजरसुंभा ते पाटोदा दरम्यान लिंबागणेश बसस्थानक येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. रास्तारोको आंदोलनामुळे काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. यावेळी सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ,शिवशक्ती भिमशक्ती विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे, मुळुकवाडीचे माजी सरपंच कृष्णा पितळे, मसेवाडीचे तुळशीराम काटकर

यांची समायोजित भाषणे झाली. सावकारे एस.जी.उपकार्यकारी अभियंता महावितरण उपविभाग ग्रामीण बीड यांच्या लेखी आश्वासनानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी निवेदन स्विकारताना पोलिस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे , मंडळ अधिकारी अशोक डरपे,पो.हे. संतोष राऊत, बाबासाहेब डोंगरे, नवनाथ मुंढे , मधुकर तांदळे, इसाक शेख, उबाळे, कुलकर्णी उपस्थित होते. आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण



थोरात, राजाभाऊ गिरे, विक्रांत वाणी, सुरेश निर्मळ,रमेश पाटील विनायक मोरे, पांडुरंग वाणी, अँड.गणेश वाणी,कृष्णा पितळे, सय्यद बशीर, औदुंबर नाईकवाडे, बोरखेडचे आरुण काकडे, विनायक शिंदे, निळकंठ काकडे , आजिनाथ घरत, शिवाजी घरत, साहेबराव घरत, विश्वंभर गिरी,अशोक जाधव, संतोष भोसले, सहभागी होते.

सावकारे उपकार्यकारी अभियंता महावितरण उपविभागीय बीड ग्रामीण यांच्या लेखी आश्वासनानंतर आंदोलन मागे

---उप कार्यकारी अभियंता महावितरण उप विभाग बीड ग्रामीण यांनी आंदोलनातील मागण्यांच्या अनुषंगाने लिंबागणेश येथील ३३ केव्ही.उपकेंद्रातील सहायक अभियंता रिक्त पदावर पदस्थापना. नियुक्तीसाठी वरीष्ठ स्तरावर पाठपुरावा केला आहे.लिंबागणेश व पोखरी ( घाट) गावच्या पाणीपुरवठा करण्यासाठी असलेल्या रोहित्रास जवळच्या ११ केव्ही वाहिनीपासुन तातडीने सर्वे करून अंदाज पत्रक मंजुरीसाठी वरीष्ठ कार्यालयास सादर करण्यात आले आहे. सद्यस्थितीत कृषी वाहिनीवर लोड वाढल्याने चक्राकार पद्धतीने विद्युत पुरवठा करण्यात येत आहे. लिंबागणेश गावातील दुरूस्ती व केबल व कट आऊट दुरुस्ती करण्याचे आदेश दिले आहेत. लिंबागणेश येथील विद्युत कर्मचारी यांचा अपघात झाल्याने सद्यस्थितीत अन्य कर्मचा–्यांना देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी देण्यात आली असल्याचे लेखी दिल्यानंतर रास्ता रोको आंदोलन मागे घेण्यात आले.

## गुटख्याच्या गोडाऊनवर दराडेंचा छापा

बीड दि.३/प्रतिनिधी:–

मागील दहा दिवसांपासून पोलीस अधिक्षकांचे पथक कारवायामध्ये थंडावले असल्याचे चित्र निर्माण झाले होते. त्यानंतर मंगळवारी सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळराजे दराडे यांनी अंबाजोगाई शहरातील एका गुटख्याच्या गोडावूनवर छापा मारून लाखोंचा माल ताब्यात घेतला असल्याचे कळते. बाळराजे दराडे यांनी जिल्ह्यात अवैध धंद्यांवर मोठ्या कारवाया केल्या होत्या. मात्र मागच्या काही महिन्यांपासून त्यांच्या कारवाया थंड पडल्याचे चित्र निर्माण झाले होते. अखेर दराडे यांनी पुन्हा एकदा अवैध धंद्यांव–ाल्यांकडे आपला मोर्चा वळविला असून अंबाजोगाई शहरातील गणेश प्रोव्हिजन या गोडावूनवर छापा मारून रजनीगंधा, आर.एम.डी, विमल, गोवा, बाबा या नावाचा गुटखा ताब्यात घेतला आहे. गणेश बिडवे किरण शेटे असे गुटखा व्यापा–यांचे नावे आहेत. या कारवाईत १० लाख ६७ हजारांचा माल पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे कळत असून या कारवा–ईत सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळराजे दराडे, पोलीस उपनिरीक्षक श्री. घाडगे, श्री. मोराळे, श्री. मुंडे, श्री. नागरगोजे, श्री. मस्के, नामदेव सानप यांचा सहभाग होता.

## स्वाती मुंडे यांना आदर्श पोलीस पाटील सेवारत्न पुरस्कार

**परळी प्रतिनिधी**

परळी दि. ३ (प्रतिनिधी): बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ तालुक्यातील दादाहारी वडगावच्या महिला पोलीस पाटील स्वाती रमेश मुंडे यांना जिल्हास्तरीय आदर्श पोलीस पाटील सेवारत्न पुरस्कारासाठी निवड झाली आहे. विविध मान्यवरांच्या हस्ते कोल्हापूर येथे ८ डिसेंबर रोजी या पुरस्काराचे वितरण होईल अशी माहिती द. युवा ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तथा पत्रकार सागर शेळके यांनी दिली.द युवा ग्रामीण पत्रकार संघ कोल्हापूर जिल्हाआयोजित विशेष शानदार पुरस्कार वितरण सोहळ्यात विविध क्षेत्रातील कर्तबगार व्यक्तींचा, संस्थांचा पुरस्कार देऊन दिग्गज म ान्यवरांच्या शुभहस्ते गौरव करण्यात येणार आहे. स्वाती रमेश मुंडे यांची जिल्हास्तरीय आदर्श पोलीस पाटील सेवारत्न पुरस्कारासाठी निवड जाहिर झाली असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष सागर शेळके, उपजिल्हाध्यक्ष डॉ राजेंद्र सूर्यवंशी, प्रा बाबूराव घुरके, अभिजीत पाटील, नारायण लोहार, गोरख कांबळे, मंगेश उबाळे, लखन तलवारे, पाडूंरग बेलेकर, हर्षद कुंभोज, सुभाष भोसले, विजय मोरबाळे यांनी दिली आहे.

## केज तालुक्यातील बीएसएनएलच्या सेवेचा बोजवारा -- दिनकर जाधव

## ग्राहक वेठीस : टॉवर आसून ओळंबा नसून खोळंबा

केज/प्रतिनिधी:–

भारत संचार निगम लि. ही भारत सरकारची कंपनी आहे. ङ्गकनेक्टिंग इंडियाङ्घ हे ब्रिद घेऊन कंपनीने बाजारात आपले स्थान पक्के केले. ग्राहकांनीही भारत सरकारचे कंपनी म्हणून अधिक पसंती दिली आणि बीएसएनएल ही प्रथम पसंतीचे दूरसंचार कंपनी बनली. भारत सरकारनेही स्वच्छ प्रमाणिक हेतू ठेवत खेड्या–पाड्या पर्यंत बीएसएनएलचे नेटवर्क पोहोचवण्याचे काम केले. परंतु आता या कंपनीला कोणाची दृष्ट लागली ही कंपनी आता नेटवर्क देण्यास असमर्थ ठरत आहे. ज्यावेळेस मोबाईल सुरुवात झाली आणि सर्व खेड्यापाड्यापर्यंत नेटवर्कचा विषय आला. त्यावेळेस बीएसएनएल या भारत सरकारच्या कंपनीने अगदी द–याखो–यापर्यंत नेटवर्क पोहोचवण्याचे काम केले आणि सर्वांना कनेक्ट करण्यात सिंहाचा वाटा उचलला. परंतु आता अगदी हायवेलगत असलेले टॉवरही धुळ खात पडून आहेत. यामुळे अनेक गावातील बीएसएनएल ग्राहकांनी आपले सिम कार्ड पोर्ट करत दुसरी कंपनी निवडली आहे.



त्यातच केज (जि.बीड) तालुक्यातील बीएसएनएलची नेटवर्क सुविधेचा बोजवारा उडाला आहे. अगदी टॉवर असलेल्या गावातही नेटवर्क बंद अवस्थेत असल्याचे पहावयास मिळत आहे. तालुक्यातील लाखो ग्राहकांची हेळसांड होत आहे. या ग्राहकांचे लाखो रु.चे रिचार्ज वाया जात आहेत. त्यामुळे बीएसएनएलच्या म ाडखाळीस आलेल्या सेवेला येथील अधिकारी आणि कर्मचारी कारणीभूत तर नाहीत ना ? अशी शंका ग्राहकांना येत आहे. अनेक गावातील टॉवर बंद असल्यामुळे टॉवर आसून ओळंबा आणि नसून खोळंबा अशी अवस्था या कंपनीची झाली आहे. त्याचबरोबर केज तालुक्यातील सर्व टॉवर सुरु करुन त्यावर ५ॠ नेटवर्क सेवा सुरु करण्याची मागणी पत्रकार दिनकर जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

–

– ...

**बीएसएनएल मोबाईल सेवा जेव्हापासून अस्तित्वात आली तेव्हापासून अनेक लाखो ग्राहक जोडलेले आहे. परंतू अधिकार्यांच्या मनमानी आणि नाष्क्रिय धोरणामुळे ग्राहकांना सेवा सुरुळीत मिळत नाही.**

**-- दिनकर जाधव सारणी (सां) ता.केज**

# पोषण आहाराची विक्री करणाऱ्या अंगणवाडी सेविका व दोन फेरीवाले यांच्या वर गुन्हा दाखल

किल्लेधारूर (प्रतिनिधी):-

तालुक्यातील भोगलवाडी येथील अंगणवाडी येथील बालकांसाठी आलेला पोषण आहार चक्क अंगणवाडी ताईने विक्री केल्याचा गंभीर प्रकार जागरुक नागरिकांम ुळे रविवारी सकाळी उघडकीस आणला होता. हा अहार घेऊन जाताना ग्रामस्थांनी रिक्षा पकडून पोलीस ठाण्यात नेऊन लावला होता. सदरील प्रकाराचा अंगणवाडी सुपरवायझर यांनी भोगलवाडी येथे जावून पंचनामा केला आहे. या प्रकरणी सुपरवायझर श्रीमती. पांडे यांनी दिलेले फिर्यादीवरून धारूर पोलीस ठाण्यात अंगणवाडी सेविका व दोन फेरीवाल्या विरोधात अपहाराचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

महिला बालकल्याण खात्या अंतर्गत अंगणवाडीतील बालकांना पोषण आहार पुरविण्यात येतो. सदरील पोषण आहार बालकांना वाटप करणे ही अंगणवाडी सेविकेचे काम आहे. परंतु हा पोषण आहार सर्व लाभार्थ्यांना न देता तो तसाच दाबून ठेवण्यात आला होता. अंगणवाडी कार्यालयात तसाच दाबून ठेवलेला पोषण आहारनागरिकांचा डोळा चुकवून फेरीवाल्यांना देण्याचे काम अनेक अंगणवाडी सेविका करतात . धारूर तालुक्यातील भोगलवाडी येथील अंगणवाडी क्रमांक चार येथील अंगणवाडी सेविका आशाबाई वेदपाठक यांनी चक्क माजलगाव येथील टमटम घेऊन आलेल्या एका फेरीवाल्याला विक्री केल्याचे रविवारी समोर आले. हे साहित्य एका पोत्यात भरुन तो फ ेरीवाला चालला असता काही तरुण व नागरिकांनी रिक्षा थांबवून झडती घेतली. आतमध्ये एका पोत्यात अंगणवाडीतील बालकांसाठी आलेल्या पोषण आहाराची पाकीट मिळून आली. यामुळे हा गंभीर



प्रकार उघडकीस आला. दुपारी अंगणवाडी सुपरवायझर श्रीमती. व्ही. एस. पांडे यांनी भोगलवाडी ते जाऊन सदर घटनेचा पंचनामा केला. यावेळी त्यांना अंगणवाडी क्रमांक चार येथील साहित्य असल्याचे सम जले . पंचनाम्यानुसार मिक्स डाळ ७१ पुडे , मुगडाळ ४६ पुडे, मीठ पुडे ५, सुकडी १७, हळद पाकीटे ५७, मिरची पावडर ११५ पाकीटे आढळून आले होते . सदर रिक्षा हा धारूर पोलिसांनी भोगलवाडी ते जाऊन पोलीस ठाण्यात लावला होता. सोमवारी पुन्हा अंगणवाडी सुपरवायझर श्रीमती पांडे व बालविकास प्रकल्प अधिकारी भोकरवाडी येथे जाऊन अंगणवाडी क्रमांक ४ च्या आहाराची चौकशी केली. यानंतर दुपारी श्रीमती पांडे यांनी धारूर पोलीस ठाण्यात जाऊन विक्री करण्यात आलेल्या पोषणा आहाराबाबत परिसर फिर्याद नोंद करण्यात आली होती. यावरून धारू पोलीस ठाण्यात अंगणवाडी सेविका आशाबाई वेदपाठक व माजलगाव येथील फेरीवाले शेख जब्बार गफार व शेख शहाबाद शेख पाशा यांच्या विरोधात रात्री उशिरा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. धारू तालुक्यात प्रथमच अंगणवाडी सेविका विरोधात गुन्हा नोंद झाल्यामुळे खळबळ उडाली आहे.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार ६ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



# शपथ घेतल्यानंतर शिंदे यांची प्रतिक्रिया, म्हणाले मी आता डेडीकेटेड टू कॉमन मॅन

**राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शपथ घेतल्यानंतर आज पत्रकारांसोबत संवाद साधला. त्यांनी देवेंद्र फडणवीस यांचं अभिनंदन केलं.**

**प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी अनेक प्रश्नांची उत्तर दिली. ते म्हणाले की, मी नाराज नाही. मी माझी भूमिका आधीच जाहीर केली होती. ते म्हणाले की, ङ्गमहाराष्ट्र हे प्रगत राज्य आहे. देशाला वैचारिक दिशा देणारा महाराष्ट्र आहे. या राज्याचे नेतृत्व करण्याची संधी माझ्या सारख्या शेतक-याचा मुलाला मिळाली हे मी माझे भाग्य समजतो. गेल्या अडीत वर्षात देशात आणि राज्यात एकाच विचाराचे सरकार असल्याने केंद्राने राज्याला भरभरुन पाठबळ दिलं. यासाठी मी पंतप्रधान मोदी यांना धन्यवाद देतो. अमित शाह यांना ही



धन्यवाद देतो. कारण ते आमच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहिले. म्हणून गेल्या अडीच वर्षाचं कार्यकाळ यशस्वी झाला. इतिहासात त्याची नोंद झाल्याशिवाय राहणार नाही. मी

### मी नाराज नाही, भूमिका आधीच जाहीर केली होती

ङ्गलोकं म्हणायचे घटनाबाह्य सरकार आहे. पण जनतेने आमच्या सरकारवर मोहर लावली आहे. मी नाराज होतो हे कोणी सांगितलं. मी २७ तारखेलाच भूमिका जाहीर केली होती. गावी गेलो तरी नाराज, तब्येत खराब असली तरी नाराज आहे असे म्हणता. मी कामाला महत्त्व देतो. मी काम करणारा कार्यकर्ता आहे. लाडकी बहीण योजनेचा डिसेंबरचा हप्ता तात्काळ दिला पाहिजे. अशा सूचना अधिका-यांना दिल्या आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं मनापासून अभिनंदन करतो. मी मुख्यमंत्री असताना दोघांनी सहकार्य केलं. आम्ही एक टीम म्हणून काम केलं.एकनाथ शिंदे म्हणाले की, ङ्गआम्ही ४० आमदार होतो. या निवडणुकीत आता ६० झालो. ही कामाची पोहोचपावती आहे. याचा अभिमान आहे. सत्ता हे जनसेवेचं साधन आहे. मला काय मिळालं यापेक्षा जनतेला काय मिळणार ही भावना ठेवून काम केलं. मी सीएम होतो तेव्हा कॉमन मॅन समजत होतो.

# बीड बस स्थानक परिसरातील अतिक्रमण हटवली



बीड (प्रतिनिधी): बीड शहरातील बस स्थानक परिसर, साठे चौक, शाहूनगर, संतोषी माता टॉकीज परीसर, डीपी रोडवरील सर्व अतिक्र मणे हटवण्यात आली. ही कारवाई मंगळवार दिनांक ३ डिसेंबर रोजी नगरपालिका आणि जिल्हा वाहतूक शाखेच्या वतीने करण्यात आली.पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतूक शाखेचे स.पो.नि. सुभाष सानप फौजदार विजय जाधवर आणि त्यांच्या टीमने बीड शहरातील बस स्थानक परिसर, बस स्टॅन्ड परिसर, साठे चौक, संतोषी माता टॉकीज, शाहूनगर डीपी रोड, राजीव गांधी चौक आदी परिसरातील रोडवरील अतिक्रमणे हटवली. या मोहीमेत वाहतूक शाखेचे प्रभारी सुभाष सानप, फौजदार विजय जाधवर, वासुदेव मिसाळ पोलीस जमादार पांडुरंग दराडे, सचिन क्षीरसागर, राजाभाऊ तांदळे पोलीस अंमलदार अनिकेत घुले वसीम शेख नगरपालिका अतिक्रमण पथकाचे प्रमुख मुन्ना गायकवाड, त्यांचे सहकारी राम रोकडे, सुजित जाधव, जावेद खान, पवन लाहोट इत्यादींनी सहभाग नोंदवला.

# अंगणवाडी सेविकेला मारहाण , युसुफवडगाव पोलीसात गुन्हा

केज । प्रतिनिधी:-अंगणवाडीच्या इमारतीचे फोटो काढायला गेलेल्या अंगणवाडी सेविकेसह तिची मुलगी आणि सासूला मारहाण केल्याची घटना युसुफवडगाव पोलीस ठाणे हद्दीत घडली आहे.युसुफवडगाव पोलीस ठाणे हद्दीतील वंदना केशव घुंडरे (रा. डिघोळअंबा ता. अंबाजोगाई) या अंगणवाडी सेविका आहेत. दि. २९ नोव्हेंबर रोजी त्या गावातील अंगणवाडीचे फोटो काढण्यासाठी गेल्या असता; या ठिकाणी आम्ही अंगणवाडी भरवू देणार नाही. असे म्हणून संदिप मधुकर घुंडरे, दैवशाला मधुकर घुंडरे, तेजस्विनी संदीप घुंडरे आणि उषा बिभीषण घुंडरे यांनी तिला विरोध केला. या चौघांनी सुनंदा घुंडरे व तिची मुलगी कु. कामिनी घुंडरे हिला मारहाण केली. भांडणाची माहिती मिळाल्या नंतर सुनंदा घुंडरे हीची सासू सिमिंता घुंडरे या भांडण सोडविण्यासाठी गेल्या असता त्यांनाही संदिप घुंडरे यांने त्याचे हातातील लाकडी पट्टीने उजव्या भुवईवर मारून जखमी केले. तर दैवशाला घुंडरे हीने तिचे हातातील लाकडी काठीने डाव्या पायाच्या मांडीवर मारून मुक्कामार दिला आणि तेथे अंगणवाडी न भरवण्याची धमकी दिली. या प्रकरणी वंदना घुंडरे यांच्या तक्रारी वरून युसुफ वडगाव पोलीस ठाण्यात संदिप मधुकर घुंडरे, दैवशाला मधुकर घुडरे, तेजस्विनी संदीप घुंडरे आणि उषा बिभीषण घुंडरे (रा. डिघोळअंबा ता. अंबाजोगाई) या चौघांच्या विरुद्ध गु. र. नं. २६६/२०२४भा. न्या. सं. ११५(२) ११८(१), ३५१ (२), ३५२ व ३ (५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्र शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली अमजद सय्यद हे पुढील तपास करीत आहेत.

# बहुचर्चित शिक्षक साजेद अली खून प्रकरणात १४ जण दोषी

बीड (प्रतिनिधी) :-शहरातील बहुचर्चित शिक्षक साजेद अली खून प्रकरणात बीड येथील न्यायालयाने १८ पैकी १४ आरोपींना दोषी ठरवले आहे. या प्रकरणी आता सोमवार दि.९ डिसेंबर रोजी निकाल देणार असल्याचे कोर्टाने नमूद केले आहे. गुजर खान उर्फ अन्वर खान मिर्झा खान याच्यासह १४ जणांना दोषी ठरवत सरफराज अयाजओद्दीन काझी, फैज मोहम्मद खान आणि सय्यद नुर उर्फ मिना या तिघांना न्यायालयाने निर्दोष मुक्त केले आहे. दरम्यान कडेकोट पोलीस बंदोबस्तात सर्व आरोपींना न्यायालयात आणण्यात आले होते. या प्रकरणातील आरोपींवरमोक्का अंतर्गत गुन्हे दाखल असल्याने न्यायालय परिसरातही एक डीवायएसपी, चार पीआय यांच्यासह १५० पोलीस अधिकारी, कर्मचा□यांचा फौजफाटा तैनात करण्यात आला होता, केसशी संबंधीत व्यक्तींनाच आतमध्ये सोडण्यात आले होते. या प्रकरणाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले होते.बीड शहरातील बालेपीर भागात १९ सप्टेंबर २०१९ रोजी सैनिकी विद्यालयातील शिक्षक सय्यद साजेद अली (वय ३८) यांची धारदार शस्त्राने हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात एकूण १८ आरोपींविरुध्द शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला होता. पोलीसांनी या प्रकरणाचा तपास करून दोषारोपत्र न्यायालयात दाखलकेले होते. सदरील प्रकरण
जिल्हा न्यायालयातील विशेष न्यायाधीश सुरेखापाटील यांच्या न्यायालयात सुरू होते. या प्रकरणी न्यायालयाने एकूण ४४ साक्षीदार तपासले तर बचाव पक्षातर्फे ५ साक्षीदार तपासण्यात आले.सदरील प्रकरणात फिर्यादी व साक्षीदार, इतर परिस्थितीजन्य पुरावा, वैद्यकीय पुरावा, न्याय वैद्यप्रयोग शाळा यांचा अहवाल तसेच सहाय्यक सरकारी वकील ॲड. अजय श्रीमंतराव तांदळे यांचा युक्तीवाद ग्राह्य धरून जिल्हा व सत्र न्यायाधीश १ तथा विशेष मोक्का न्यायाधीशश्रीमती एस. आर. पाटील यांनी गुजर खान सह१४ जणांना दोषी ठरवले तर तिघांची निर्दोषमुक्तता केली. याप्रकरणी सरकार पक्षातर्फे विशेष सरकारी वकील ॲड. अजय तांदळे यांनी कामपाहिले. त्यांना जिल्हा सरकारी वकिल तथा शासकीयअभियोक्ता ॲड. अजय राख यांनी मार्गदर्शन केले व सर्व सहाय्यक वकिल यांचे सहकार्य लाभले. सदर प्रकरणात पैरवी अधिकारी पीएसआय बी.व्ही. जायभाये यांनी त्यांना सहकार्य केले.बीडच्या विशेष मोक्का न्यायालयाचा पहिलाच मोठा निकाल बीड येथील बहुचर्चित साजेद अली खून प्रकरणात मोक्का अंतर्गत गुन्हे दाखल झालेले असल्याने सदरील प्रकरण बीडच्या विशेष मोक्का न्यायालयात चालवण्यात आले. आत्तापर्यंतच्या इतिहासात विशेष मोक्का न्यायालयाचा हा पहिलाच मोठा निकाल असुन तब्बल १४ जणांना दोषी ठरवण्यात आले आहे. त्यामुळे न्यायालयाने दिलेला निकाल महत्वाचा ठरला असुन आता मोक्का न्यायालय सोमवार दि.९ डिसेंबर रोजी काय निकाल देते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या १४ जणांना ठरवले दोषी अन्वर खान उर्फ गुजर खान मिर्झा खान (रा. गुलशन नगर बालेपीर बीड), मुजीब खान मिर्झा खान पठाण, सय्यद नासेर सय्यद नुर, सय्यद शाहरूख सय्यद नुर, शेख उबेद शेख बाबू, शेख सरफराज उर्फ सरू डॉन, शेख शहेबाज शेख कलीम (रा. रोशनपुरा बीड), शेख अमर शेख अकबर (रा. गुलशन नगर बीड), शेख बबर शेखयुसूफ (रा. खासबाग बीड), आवेज काझी (रा. काझी नगर बालेपीर बीड), शेख इम्रान उर्फ काला शेख रशीद (रा. काझी नगर बालेपीर बीड), शेख मझहर उर्फ काल्या उर्फ हाफ मर्डर शेख रहीम (रा. बांगर नाला बीड), बबर खान गुल मोहम्मद खान पठाण (रा. शहेबाज कॉलनी नेकनूर), शेख वसीम शेख बुन्हानोद्दीन (रा. रोशनपुरा बालेपीर बीड) या चौदा जणांना दोषी ठरवले आहे. या प्रकरणात एकूण १८ जणांविरूध्द गुन्हा दाखल झालेला असुन त्यापैकी सतरा जण अटक असुन इम्रान पठाण उर्फ चड्डा हा फरार आहे.

# राज्यात देवेंद्रपर्वाला सुरुवात; एकनाथ शिंदे आणि अजित पवारांनी घेतली उपमुख्यमंत्रीपदाची शपथ

**मुंबई प्रतिनिधी**

मुंबई। प्रतिनिधी महायुतीला निर्विवाद बहुमत मिळाल्यावर मुख्यमंत्रीपदासाठी एकनाथ शिंदे पुन्हा प्रयत्नशील होते. २०२२पासून दिल्लीतील भाजप नेतृत्वाशी वाढलेली जवळीक शिंदेंसाठी आशादायक होती. गेला आठवडाभर शिंदे यांनी त्यादृष्टीने पुरेपूर प्रयत्न केले. मात्र, भाजपचे १३२ आमदार निवडून आल्यानंतर भाजपा श्रेष्ठींनाही फडणवीस यांच्या निवडीशिवाय पर्याय उरला नाही. दिल्लीत झालेल्या महायुतीच्या प्रमुख नेत्यांच्या बैठकीत भाजपच्या नेतृत्वाने शिंदे यांना स्पष्टपणे तसे कळवले होते. त्यावर बुधवारी शिक्कामोर्तब करण्यात आले. दरम्यान, आज शपथविधीचा दिवस. राज्याला आज नवं सरकार मिळणार आहे. तर एकनाथ शिंदेही आता उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्यास राजी झाले आहेत. त्यामुळे राज्याला पुन्हा एकदा एक मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री असं समीकरण पाहायला मिळणार आहे. देवेंद्र फडणवीस यांनी तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली असून अजित पवारांनी सहाव्यांदा आणि एकनाथ शिंदेंनी पहिल्यांदा उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आहे. राज्यात आता देवेंद्रपर्वाला सुरुवात झाली आहे. महाराष्ट्राचे ३१ वे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी आज शपथ घेतली. मी देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस... असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी पद व गोपनियतेची शपथ घेत स्वत:च्या नावावर वेगळा विक्रम रचला. तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणारे ते महाराष्ट्रातील एकमेव नेते आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींसह अनेक राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रीयमंत्री, दिग्गज भाजपा नेते, बॉलिवूड सेलिब्रिटी, क्रिकेटर्स, उद्योगपती, आमदार, खासदार आणि हजारो कार्यकर्त्यांच्या



साक्षीने महाराष्ट्राचे राज्यपाल राधाकृष्णन यांनी देवेंद्र फडणवीस यांना शपथ दिली. फडणवीस यांच्यासह शिवसेना नेते एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनीही उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. मुंबईतील आझाद मैदानावर शपथविधीचा हा महासोहळा संपन्न झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आगमनानंतर राष्ट्रगीत आणि महाराष्ट्र गीत गाऊन शपथविधी सोहळ्याला सुरुवात झाली. विधानसभा निवडणुकीत भाजपने देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात मोठा विजय मिळवला, महायुतीला राज्यात २३७ जागांवर यश मिळत स्पष्ट बहुमत मिळालं. त्यामध्ये, १३२ जागांसह भाजप हा राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. त्यामुळे, भाजप नेताच मुख्यमंत्रीपदी शपथ घेणार हे जवळपास निश्चित होते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून शिवसेना नेते एकनाथ शिंदे नाराज असल्याची चर्चा होती. त्यामुळे ते उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार की नाही याबाबत सस्पेन्स होता. अखेर एकनाथ शिंदे यांचीही नाराजी दूर झाली असून त्यांनीही उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यामुळे, राज्यात पुन्हा एकदा महायुतीचं सरकार स्थापन झालं असून लवकरच मंत्रिमंडळ विस्तार होणार असल्याची माहिती आहे. भाजप नेते चंद्रकांत पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांची भाजपच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड करण्यात आल्याची घोषणा केली, तेव्हाच मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस हेच भाजपचा चेहरा असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे, गावागावात, मतदारसंघात आणि संपूर्ण महाराष्ट्रात भाजप समर्थक व कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. त्यानंतर, नियोजित वेळ आणि तारखेनुसार आज शपथविधीचा सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न झाला.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com